# <u>*वार्तापत्र*</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली. दिनांक 05/02/2018

# <u>*एकजहाल माओवादी ठार*</u>

दिनांक 05/02/2018 रोजी माओवादयांनी “दंडकारण्य बंद”ची घोषणा दिली होती. यामुळे गडचिरोली जिल्हयात मा. पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. अभिनव देशमुख सो. यांच्या आदेशानुसार मा. अपर पोलीस अधिक्षक (अभियान) गडचिरोली डॉ. हरी बालाजी सा◌ो., मा. अपर पोलीस अधिक्षक (नक्षल सेल) गडचिरोली श्री. महेंद्र पंडीत सा◌ो. यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात नक्षलविरोधी अभियान तीव्र करण्यात आले होते. उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या पोमके गट्टा (जां.) हद्दीतील मौजा मुरेवाडा जंगल परिसरात सी-60 चे जवान नक्षलविरोधी अभियान राबवित असताना दुपारी 02.00 वाजेच्या सुमारास दबा धरून बसलेल्या माओवादयांनी पोलीस पथकावर अंदाधुंद गोळीबार केला. प्रत्युत्तरादाखल आणि स्वसंरक्षणार्थ पोलीसांनी

माओवादयांच्या दिशेने गोळीबार करत चोख प्रतिकार केला. माओवादयांच्या गोळीबारास न जुमानता पोलीस आगेकुच करीत असतांना पोलीसांचा वाढता दबाव पाहुन माओवादयांनी घनदाट जंगलाचा फायदा घेत पळ काढला.

त्यानंतर घटनास्थळावर शोधमोहिम राबविली असता 01 पुरूष माओवादी मृतदेह मिळुन आला असून एक 8 एम.एम. रायफल तसेच मोठया प्रमाणावर नक्षल वापरात असलेले दैनंदिन साहित्य मिळून आले. मृत पुरूष माओवादी याची ओळख पटविण्याचे काम चालु आहे. माओवादयांनी पुकारलेल्या बंद दरम्यान झालेल्या या चकमकीत मिळालेल्या यशाने माओवादी चळवळीला जबर हादरा बसला आहे. चकमकीनंतर सदर जंगल परिसरात नक्षल विरोधी अभियान तीव्र करण्यात आले आहे.